# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

सिध्देश्वर पेठ, सोलापूर पिन-४१३ ००१.

आस्थापना शाखा

दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७३१०११, फॅक्स क्र.- ०२१७-२६२१११२०, Email Id- revbrsol.rfsol-mh@gov.in


---

जा.क्र.मह/आस्था-२/प्र.क्र.१३/आरआर- १४१/२०१८ सोलापूर दि. २२/०१/२०१८.

विषय - जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०१८ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती (provisional) जेष्ठता सुची प्रसिध्द करणेबाबत.

**ज्ञा प न**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११ अन्वये शासन सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांची जेष्ठतासुची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वकष धोरण ठरविण्यात आलेले आहे.

सदर शासन निर्णयातील नियम ३ मधील (२) (अ) मध्ये आधीच्या वर्षी (म्हणजेच दि.०१.०१.२०१७) प्रसिध्द झालेली अंतिम ज्येष्ठतासुची पुढील वर्षी पुन्हा नव्याने तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासुची तयार करताना विचारात घेऊ नये व प्रसिध्द करण्यात येऊ नये असे निदेशीत केले आहे. केवळ त्या संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहीत मार्गाने नियुक्ती अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासुची तयार करुन प्रसिध्द करावी असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आस्थापनेवरील पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०१८ रोजीची तात्पुरती (Provisional) जेष्ठता सुची तयार करण्यात आली असून ती यासोबत जोडली आहे.

सोलापूर जिल्हयातील सर्व संबधित कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुखांना कळविण्यात येते की, सदरची यादी कार्यालयात प्रसिध्द करुन याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. तसेच **तात्पुरती सेवाजेष्ठता यादीबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या हरकती / आक्षेप असल्यास त्याबाबत त्यांचे सेवा अभिलेखावरून खात्री करून सदरची यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास संबंधिताचे हरकती / आक्षेप आपले सुस्पष्ट अभिप्रायासह पाठविण्यात यावे**. एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव यादीमध्ये समाविष्ठ करणेचे राहीले असल्यास अथवा सेवा तपशीलामध्ये काही चुका असल्यास योग्य त्या पुराव्यासह सेवा जेष्ठता यादीचे नमुन्यात अहवाल सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती / आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. प्रस्तुत सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द केलेबाबत अहवाल सोबतच्या विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रासह या कार्यालयाकडे सादर करावा.

सही/-xxx

(डॉ.राजेन्द्र भोसले,भा.प्र.से.)

**जिल्हाधिकारी सोलापूर**

प्रत:- तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- जिल्हाधिकारी पुणे / सांगली / सातारा / कोल्हापूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

(संजय तेली)

**निवासी उपजिल्हाधिकारी**

**जिल्हाधिकारी सोलापूकरिता**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, दिनांक ०१.०१.२०१८ रोजीची पहारेकरी यांची तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional) सेवा  जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणली असून त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतली आहे. तसेच संबंधितांच्या सेवा पुस्तकावरुन यादीतील स्तंभ क्रं. ३ ते १० ची माहिती तपासुन घेतली असून यादीत नमुद केलेल्या नोंदी बरोबर असल्याची मी खात्री देत आहे.

सही /---

**कार्यालय प्रमुख स्वाक्षरी**

**प्रपत्र-अ**

**जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आस्थापनेवरील पहारेकरी संवर्गात दिनांक ०१/०१/२०१७ ते ३१/१२/२०१७ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या पहारेकरी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०१८ रोजी स्थिती दर्शविणारी तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional) सेवा जेष्ठतासुची.**

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | नांव | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष.) | जेष्ठता दिनांक/ जेष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **निरंक** | | | | | | | | | | |

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी सो.
यांची स्वाक्षरी असे.

(संजय तेली)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर**